पृ/3


# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषयः–** सोमवार दि. २२ जानेवारी २०२४ रोजी रामरथयात्रा सोहळयानिमित्त भोजन तयार करून वाढण्याच्या मजूरीबाबत मोहोरबंद दरपत्रके

सोमवार दि. २२ जानेवारी २०२४ रोजी रामरथयात्रा सोहळयानिमित्त मंदिराशेजारील संभाजी पार्क मैदानात मंडप उभारून अंदाजित ५००० भाविकांकरीता रात्रौ ८ ते रात्रौ १० या कालावधीत महाप्रसादाच्या विशेष भोजनाची व्यवस्था करण्याचे न्यासातर्फे योजिले असून सदर भोजन तयार करून वाढण्याच्या मजूरीबाबत मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

अटी व शर्ती

१) दरपत्रकामध्ये नमूद दिवसाकरीता मजूरीचे दर नमूद करणे आवश्यक आहे.

२) दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्चासह मूळ दर असावा व कर अतिरीक्त असा उल्लेख करावा.

३) प्रत्येक कंत्राटदाराने फक्त १ दरपत्रक सादर करावे.

४) कंत्राटदाराने सेवाकर क्रमांक (जी.एस.टी. क्र.) दरपत्रकात नमूद करावा.

५) स्वयंपाकाकरीता लागणारा सर्व कच्चा माल (किराणा माल), भाजीपाला न्यासातर्फे कंत्राटदारांना पुरविण्यात येईल.

६) भोजन बनविण्याच्या संपूर्ण पूर्वतयारीसह स्वयंपाक वाढणे, ताटे–भांडी धुणे, चपात्या/पुरी करणे इ. कामे करणे तसेच स्वयंपाकाकरीता लागणारी सर्व भांडी, गॅस शेगडया, सिलेंडर कंत्राटदारास आणावी लागतील.

७) कंत्राटदारास देयकाची रक्कम कंपनीच्या नावे आर.टी.जी.एस.द्वारे अदा करण्यात येईल.

८) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

९) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

१०) दरपत्रकधारकाने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकीत करुन सादर करावयाची कागदपत्रे

अ) आयकर नोंदणी पॅनकार्ड

ब) सेवाकर जी एस टी नोंदणी दाखला

११) सिलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.

१२) दरपत्रके सिलबंद लखोटयात शनिवार, दि. २०.०१.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत न्यासाच्या नोंदणी शाखेत सादर करावीत.

१३) शनिवार, दि. २०.०१.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंत्राटदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी कृपया उपस्थित रहावे.

Vpatil

(वीणा पाटील)

कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

**विषय:–** सोमवार दि. २२ जानेवारी २०२४ रोजी रामरथयात्रा सोहळयानिमित्त भोजन तयार करून वाढण्याच्या मजूरीबाबत मोहोरबंद दरपत्रके

## पदार्थांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | पदार्थांचा तपशील |
|---|---|
| १ | साधा भात |
| २ | डाळ (साधे वरण) |
| ३ | सुकी बटाटा भाजी, कुर्मा रस्सा भाजी |
| ४ | गोड पदार्थ गुलाबजामुन |
| ५ | पुरी |
| ६ | कोशिंबीर, पापड, लोणचे, |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


## दरपत्रकाचा तपशील

**विषयः—** सोमवार दि. २२ जानेवारी २०२४ रोजी रामरथयात्रा सोहळयानिमित्त भोजन तयार करून वाढण्याच्या मजूरीबाबत मोहोरबंद दरपत्रके

**नावः** ____________________________________________

**पत्ताः** ____________________________________________

____________________________________________

**पॅनकार्ड क्रमांकः** ______________________________

**जी एस टी क्रमांकः** ______________________________

| अ. क्र. | कामाचा तपशील | व्यक्तींकरीता | एकत्र मजुरी दर रुपये (कर वगळून—सर्व समावेशक खर्चासह मूळ दर) |
|---|---|---|---|
| १ | रात्रौ ८ ते रात्रौ १० भोजन पंगत व्यवस्था | **अंदाजित ५००० व्यक्तींकरीता** | रुपये................................/— |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का